# बृहन्मुंबईमहानगरपालिका

(अनुज्ञापन (अतिक्रमण निर्मूलन) खाते, एफ/दक्षिण विभाग)

क्र. सआ/एफ दक्षिण / ३३७६२ /अति. निर्मु.दिनांक ०९.१२.२०२५

## स्वारस्य अभिव्यक्ती जाहिरात

विषय:-एफ/दक्षिण विभागामध्ये अतिक्रमण निर्मूलन वाहनावर अशासकीय संस्थेकडून कंत्राटी कामगार घेण्याबाबत.

एफ/दक्षिण विभागामध्ये अतिक्रमण निर्मूलन वाहनावर कंत्राटी कामगार घेण्याबाबत एका अशासकीय संस्थेची निवड करण्यात येणार आहे. सदर वाहनावर कामगारपुरवठा करण्याचा अनुभव असणा-या किंवा महानगरपालिकेच्या इतर विभागामध्ये कामगार पुरवठा केल्याचा अनुभव असणा-या बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात नोंदणीकृत असणा-या नोंदणीकृत अशासकीय संस्था, नोंदणीकृत मजूर सहकारी संस्था, , सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, औदयोगिक सेवा सहकारी संस्थ्या इत्यादि संस्थाकडून अर्ज मागवण्यित येत आहेत. संस्थेची पात्रता यादी तयार करुन सोडत पद्धतीने निवड करण्यात येईल. निवड झालेल्या संस्थेकडून प्रति दिन सकाळी ०७.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत आठ तासांकरीता (सकाळ सत्र / संध्याकाळ सत्र किंवा ब्रेक ड्यूटी ) एकूण १० कामगारांची आवश्यक आहे.

अर्जाचा नमुना एफ/दक्षिण विभाग कार्यालय, पहिला मजला, वरिष्ठ निरीक्षक ( अतिक्रमण निर्मूलन ) यांच्या कार्यालयात कामाच्या रक्कमेच्या ०.१२ टक्के ( अंदाजे रुपये २२१९/- ) + १८ टक्के GST ही रक्कम रोख स्वरुपात भरुन (ना परतावा) दि. १०.१२.२०२५ ते दि १५.१२.२०२५ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी (रविवार व सार्वजनिक सुट्टी वगळून) सकाळी १०.३० ते दुपारी ०१.०० वाजेपर्यंत मिळू शकेल. अर्ज सादर करण्याचा कालावधी दिनांक १०.१२.२०२५ पासून दिनांक १२.१२.२०२५ पर्यंत (रविवार व सार्वजनिक सुट्टी वगळून) कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.३० ते ०५.३० वाजेपर्यंत असेल व दि. १३.१२.२०२५ व दि. १५.१२.२०२५ रोजी दुपारी ०१.०० वाजेपर्यंत असेल. नमुद केलेल्या कालावधीनंतर सादर करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

निकषानुसार पात्र असलेल्या संस्थेच्या सूचीमधून सोडत पद्धतीने निवड झालेल्या संस्थेला योजनेच्या अटी व शर्तीसापेक्ष सहाय्यक आयुक्त, एफ/दक्षिण विभाग हे कामाचे वाटप करतील. वरील निकष पूर्ण न करणारे अर्ज अपात्र ठरविण्यात येतील.

सोडत पद्धतीची निकाल प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार सहाय्यक आयुक्त एफ/दक्षिण विभाग यांना राहतील.

अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक १५.१२.२०२५ रोजी दुपारी ०१.०० वाजेपर्यंत असेल.

निविदा सोडत दिनांक १५.१२.२०२५ रोजी दुपारी ठिक ०३.०० वाजता काढण्यात येईल.

सही / - ०९.१२.२०२५

सहाय्यक आयुक्त, एफ/दक्षिण विभाग